# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी
# जिल्हा - ठाणे.

प्रसिध्दीसाठी
दिनांक:- १६/०१/२०२५.

**<u>भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिके तर्फे अनधिकृतपणे नळ कनेक्शन घेणाऱ्यावर केलेली कारवाई.</u>**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मौजे- नारपोली, हसन मेहता बिल्डिंग समोर, समरू बाग, जूना गौरीपाडा, भिवंडी येथे पाहणी केली असता त्याठिकाणी मालक श्री. अब्दुल कलाम शाह (उर्फ बबलू, विकासक), श्री. तबरेज शेख (विकासक) व श्री मोह. सैफ आझाद खान (प्लंबर) यांनी मनपाची कोणतीही रीतसर परवानगी न घेता मनपाचा रस्ता खोदून ½" व्यासाचे ११ नळ कनेक्शन अनधिकृतपणे घेतले असल्याने त्यांचेवर भोईवाडा पोलिस स्टेशन येथे भा. न्या. सं. (B. N.S) २०२३ चे कलम ३२४(४),३२४ (५),३०३(२) व ३२६(c) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

तर भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मौजे नारपोली, गोल्डन हॉटेल, जयराम टावरे मार्ग, दूध बावडी नाका, भिवंडी येथे पाहणी केली असता श्री. आतिक खान यांनी मनपाची कोणतीही पूर्व परवागनी न घेता महानगरपालिकेचा रस्ता खोदून मनपाचा जल वाहिनीला छिद्र पाडून सर्विस सेंटर करिता (व्यापारी) ½" व्यासाचे एक नळ कनेक्शन अनधिकृत घेतले असल्याचे असल्याने त्यांचेवर निजामपूर पोलिस स्टेशन येथे भा. न्या. सं. (B. N.S) २०२३ चे कलम ३२४(४), ३२४ (५),३०३ (२) व ३२६ (c) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरची कारवाई मा. प्रशासक तथा आयुक्त सो, यांचे आदेशान्वये मा. कार्यकारी अभियंता श्री संदीप पटणावर, पाणी पुरवठा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली, मा. उप अभियंता श्री सर्फराज अंसारी यांचे अधिपत्याखाली श्री विराज विराज भोईर (पथक प्रमुख), नफीस मोमीन (सहा. पथक प्रमुख) यांचे मार्फत करण्यात आली.

श्रीकांत परदेशी
माहिती व जनसंपर्क अधिकारी
भिवंडी नि. शहर महानगरपालिका